विषय काव्य
ग्रं. क्र. १०५५
१९८६

## नवयुग चैतन्य किरण माला.

# आझाद हिंद कूचगीतें

# सर १ ला

कवि :—शशिकांत दत्त

[ सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन ]

REFBK-0006783
REFBK-0006783

य :—२ आणे

## आझाद हिंद कूचगीतें

## भाग १ ला.

(किरण १ ला)

### राष्ट्रवीरांना वंदन.

६७८३

भारतीय वीरांनां । करूं प्रथम वंदनाला ।
खुदीराम बोसानां । शूर चापेकर बंधूनां ।। धृ० ।।
मदनलाल धिंग्रानां । दहशत वादी कान्हेरे त्रयिना ।
खंद्या शहिदविरा फडक्यानां दासा जतिना ।
कट्ट्या कर्मविरा लालाजीना ।
वंदा विबुधवरा टिळकानां गांधीचरणा ।
नमूं भगतसिंगा आतां ।। १ ।।
राजगुरू तरूणा । स्मरू सुखदेव हुतात्म्या ।
बट्ट केशर बाळा । स्तवूं चंद्रशेखर वीरा ।। २ ।।
हिंदी समरवीरा आझादी सैन्या नमुंया ।
सच्चा रणचतुरा वीरांगना ।
वंदा विदुषि सती विररमणी लक्ष्मीविजया ।
पंडित नेहरू जवाहीरा ।। ३ ।।

आझाद हिंद युद्ध देवता लक्ष्मीबाईला ।
आझाद हिंद फौज नेताजी सुभाषशार्दूला ॥ ४ ॥

——:०:——

( किरण २ रा )

## पुकार.

सज्ज तरुण व्हा लढाला ।
प्राण लावुया पणाला
शौर्य दावुया जगाला ।
गा ऽऽऽ ।
गा जय हिंद गा । घ्या मनिं भारता ।
या मरु मारता । मिळवुं या यशा ॥ १ ॥
अरिविनाश प्रलयकाल निकट पातला ।
करि उठाव घालि घाव मारि शत्रुला ॥ २ ॥
काळा हांसुया । यागा मांडुया ।
निजरक्ता सांडुया । रणरंगीं रंगुया ॥ ३ ॥

——:——

( किरण ३ रा )

## रणशिंग

बघ वाजतसे पडघम् । रणभेरि करी दुमदुम्
दुम् दुम् ॥धृ॥
अजि हा मंगल दिन आला
चला करु कुर्बानीला ।
आठवुया शिव नरपतिला
करु वंदन नरवर प्रियलाला ॥ १ ॥
रणदेवि करू पूजन् । करु अर्पण पदयुगि तनमनधन ।
शिर कमलांचा घालुनि हार
करू देशासाठीं जोहार ।
परिमार्जन करु या पापाचें
मग मोचन आपुल्या मातेचें ॥ २ ॥

---

( किरण ४ था )

## अभयवरदान

जा करतलीं शिर घेडानिया लढ
विजय मिळवा जा ।

सारे अमर व्हा । यारे स्वर्गि जा ।
गारे सुयश गा । चला या चला ॥
काळाचेंही भय नसें तुला ।
भूमातेचा अभय वर तुला ॥ १ ॥

———:———

## ( किरण ५ वा )

# शत्रुवर स्वारी

जय जय जय जय घोष करा
भरतभुमीचें ध्यान धरा ।
झप् झप् झप् झप् पद उचला
करूं भीषण हल्ला ॥ १ ॥
सप् सप् निवटूं शत्रूला
शहिद अमर करूं कीर्तीला ।
तन मन अर्पू राष्ट्राला
सोडवुं मातेला ॥ २ ॥
या या, या या हो या या,
सकल या या, वीरानों या ।
या या, संतोषवूंया, विजयि झेंडा उभारू या ॥ ३ ॥

———:———

## ( किरण ६ वा )

# हिंदमातेची हांक

या बंधूनो या भगिनीनों या समरीं सामिल व्हा ।
घ्या समाज सेवा स्वराज्य सेवा असिधाराव्रत घ्या ।
हा तिरंगि झेंडा खांद्यावर घ्या आघाडीवर जा ।
भूदेवीच्या गळ्यांत घाला, विजयाची माळा ॥ १ ॥
शुभमंगल दिन दावा भारता
स्वर्गी यशोगान गावु या बंधुया ॥ २ ॥
या करू संघटना ऐक्यता,
विषमता महारोग घालवा ।
बंधुभाव हा स्थापुया चला या चला
सीधा क्रांतिचा खरा मार्ग हा वरा ॥ ३ ॥

——:०:——

## ( किरण ७ वा )

# क्षितीजा पलीकडे.

या सैनिकानों शीघ्रगती । नीट पहा क्षितिजावरती ।
ती जाई सरिता वक्रगती । या मातेचें प्रिय दर्शन घ्या ॥धृ॥

ही निकट पहा पर्वतश्रेणी
मार्ग असे खिंडीमधुनी।
हृदय भरुनि ये प्रेमानी
केव्हां भेटे प्रियजननी ॥ १ ॥
ही श्रवण करा पूनित वाणी
माय झुरे बहु शोकानी।
तुटुनि पडूं या त्वेषानीं
धाठवुं अरिला यमसदनीं ॥ २ ॥

——:०:——

(किरण ८ वा).

## ब्रिटाशानों चालते व्हा

जा ब्रिटीशानों सोडुनी जा जा चालते व्हा जा जा।
चंबुगवाळें घेउनि जा जा निजधामाला जा ॥ धृ० ॥
शंभर वर्षें भरलीं तुमचीं दुष्मन जा आतां।
ना तरि तुम्हां हाकुनि देऊं मारुनिया लाथा ॥
तागडि घेउनि येथें आला पोट भरायाला
फोडा झोडा फंदफितुरिनें तुम्हिं राजे बनला ॥ १ ॥

नानापरिनें छळिलें, पिळिलें, लुटिलें देशाला ।
निःशस्त्रांना मारुनि केलें प्राशन रक्ताला ॥
स्त्री हत्येचे पातक केले लाज न तुम्हाला ।
तुम्हि माणुसकीला विसरुनि गेला प्रतिराक्षस बनला ॥ २ ॥

——:०:——

(किरण ९ वा)

## शक्तीचें सार्थक

या या युवकानों या सारे ।
देहा बलवान करू या ।
भारताच्या सेवेला ही काया लावूया ।
पथकातें स्थापूया, व्यायामातें लागूया हुश्यार ॥ १ ॥
राखुनी शीला स्वाभिमानें चाला ।
जुल्मी खला तुडवा ।
सज्जना वाचवा । भेदातें घालवा ।
देहाला झिजवा । हाच माणुसकीचा धर्म वाढवा ॥ २ ॥

——:०:——

६८८३
६७८३

(किरण १० वा)

## शेतकरी कामकरी संघराज्य स्थापुया.

बिगि बिगि या र या ॥

माणसाचा धर्म दावूया ।

निराशेची रात संपली या या ॥

कामाला लागुया, शेतकरी ग्रामराज्य स्थापुया ।

सावकारी पाश तोडू या चला ॥ धृ ॥

देशद्रोह्यांना समद्यांना हाणा ।

लांच खाऊना शुद्धिवर नीट आणा ।

फंद फितुरांना पत्र्या ठोकाना ।

गरिबांना दुःखिताना रक्षुया ॥१॥

दुष्ट रूढी मोडा, उच्च नीच भाव सोडा ।

जाती पातींचें भांडणांचे मूळ गाडा ।

साक्षरेतचा करा प्रसारा ।

मद्यपानाच्या करा संहारा ।

शेतकरी कामकरी संघराज्य स्थापुया ।

सावकारी पाश तोडु या चला ॥२॥

श्री समर्थ छापखाना, ठाणें

सर्व तऱ्हेचे छपाईचें काम
सुबक व वक्तशिर करून
देण्यांत येईल.